# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 313/2022 दिनांक : 13.08.2022**

## 1)घरफोडी :–

**लिंबगाव :–** दिनांक 07.08.2022 रोजी 17.00 वा. ते दिनांक 11.08.2022 रोजी 20.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरातुन मौजे पुयणी शिवार ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा आपले घराला कुलूप लावुन कामकाजासाठी कुटूंबासह बाहेर गावी गेला असता चॅनल गेटचे कुलूप तोडुन घराचे कडी कोंडा कुलूप तोडून आत घरात प्रवेश करून घरातील नगदी व सोन्या चांदीचे दागीने असा एकुण किंमती 3,12,300/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी दिनकर अभंगराव बोरुळकर, वय 49 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. पुयणी ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरन 130/2022 कलम 454,457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री सुर्यवंशी, मो.क्रं. 9011472277** हे करीत आहेत.

## 2)मो. सा. चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 03.08.2022 रोजी 13.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान, **मा. न्यायालय परिसर, नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो.सा. क्रं. एमएच–26/ए–9636 किंमती 20,000/– रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी अवधुत बालासाहेब लोमटे, वय 43 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. डोंगरकडा ता. कळमनुरी जि. हिंगोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 283/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/11 सोनटक्के, मो.क्रं. 9805007511** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**1)नांदेड ग्रामीण :–** सप्टेंबर 2020 ते 10 फेब्रवारी 2022 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी व माहेरी कळमनुरी ता. कळमनुरी जि. हिंगोली ह. मु. जुना मुजामपेठ, नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस चिकनचे दुकान टाकण्यासाठी माहेरहुन तिन लाख रुपये घेवून ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून तिचा शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 491/2022 कलम 498(अ),323,504,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/616 चक्रधर, मो.क्रं. 7020448411** हे करीत आहेत.

**2)मुखेड :–** दिनांक 10.05.2022 ते दिनांक 12.08.2022 रोजी चे दरम्यान, **वाल्मीक नगर मुखेड ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस घरबांधकामासाठी माहेरहुन पाच लाख रुपये घेवून ये म्हणुन उपाशी पोटी ठेवून शिवीगाळ व मारहाण करून तिचा शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 22 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 247/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1762 राठोड, मो.क्रं. 8767703293** हे करीत आहेत.

## 4)फसवणुक :–

**1)रामतीर्थ :–** दिनांक 11.08.2022 रोजी 12.30 वा. चे सुमारास, **नर्सी मुखेड रोडवर गॅस एजन्सी जवळ मौजे नरसी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील अनोळखी आरोपीने फिर्यादी चे मुलगा व त्याची पत्नी यास म्हणाला कि तुम्हाला सोनपापडीवर स्कुटी लागली आहे स्कुटी घेता की 70,000/– रुपये घेता म्हणाला. तसेच तुमच्याकडे दोन तोळे सोने खरेदी केलेली पावती आहे का असे विचारले व नसेल तर तुमचे कडील दोन तोळे सोने सोबत घ्या सोनाराकडुन पावती करुन घेऊ असे म्हणुन दोन तोळे सोने किंमती 40,000/– रुपयाचे व 4000/– रुपयाचा मोबाईल असे एकुण 44,000/–रुपयाचा माल घेवून निघुन गेला व फिर्यादीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी परशुराम विठ्ठल खांदाजे वय 42 वर्षे व्यवसाय मजुरी रा. जुनेगाव नर्सी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतीर्थ** गुरन 126/2022 कलम 420 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री शेख, मो.नं. 9960161935** हे करीत आहेत.

**2)भोकर :–** दिनांक 12.08.2022 रोजी 13.00 वा. ते 05.00 वा. चे दरम्यान, **बिंदू कॉलेज जवळ ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील अनोळखी आरोपीने फिर्यादी बाईस तुम्ही घेतलेल्या सोन्याचे नेकलेस त्यावर तुम्हाला लक्की ड्रॉ लागला आहे. असे म्हणुन फसवणुक करुन तिच्या अंगावरील सोन्याचे दागीने एकुण किंमती 1,31,500/– रुपयाचे वजन करण्यासाठी काढुन द्या असे म्हणाल्याने फिर्यादी बाईन काढुन दिले असता आरोपीने खिशात ठेवून मोटार सायकलवर निघुन गेला. फिर्यादीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी अंजली हनुमंतराव लामेगे वय 33 वर्षे व्यवसाय घरकाम रा. धानोरा ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरन 278/2022 कलम 420 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कांबळे, मो.नं. 9923104521** हे करीत आहेत.

## 5)अपघात :—

**भाग्यनगर :—** दिनांक 19.05.2022 रोजी 00.30 वा. चे सुमारास, **तुळशीराम नगर पाटीजवळ, नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा **मुलगा मयत स्वप्नील प्रेमानंद ढवळे वय 22 वर्ष व्यवसाय शिक्षण रा. कल्याणनगर तरोडा, नांदेड** हा मो.सा. क्र. एमएच/26—एम—7147 वर बसुन येत असताना पाठीमागुन स्कुटी क्रं. एम.एच./26—बीएल—4107 च्या चालकाने त्याचे ताब्यातील स्कुटी हयगय व निष्काजीपणे, भरधाव वेगात चालवुन फिर्यादीचे मुलास धडक देवून मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी प्रेमानंद हिरामन ढवळे वय 43 वर्षे व्यवसाय ॲटो चालक रा. कल्याणनगर तरोडा बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं. 287/2022 कलम 304(अ),279,337,338 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/श्री भिसे, मो.क्र. 9822987573** हे करीत आहेत.

## 6)खंडणी :—

**भोकर** :—दिनांक 29.07.2022 रोजी 03.00 वा. ते 05.00 वा. चे दरम्यान, **मंजित कॉटन मिल समोरील बायपास रोडवर भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे व्यापारी असुन ते तांदळाचा माल ट्रक क्रं. एम.एच./26—बी—5660 मध्ये भरुन साक्षीदारासह हिमायतनगर येथे विक्रीसाठी जात असतांना नमुद ठिकाणी यातील आरोपीतांनी संगणमत करुन त्यांची कार क्रं. एम.एच./02—ईएच—3292 हि ट्रक समोर उभी करुन तुमचा माल राशनचा आहे म्हणुन तुम्हाला दोन लाख रुपये आम्हाला द्यावे लागतील अन्यथा तहसिल व पोलीस कार्यवाहीची भिती दाखवुन 20,000/—रुपये खंडणी घेतली. वगैरे **फिर्यादी मोगल लुकमान बेग एजाज बेग, वय 40 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. तळेगाव ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 275/2022 कलम 384,341,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री दिगंबर पाटील, मो.क्रं. 9850550670** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :—

**भोकर :—** दिनांक 12.08.2022 रोजी 13.00 वा. चे सुमारास, **भोकर ते नांदेड जाणारी रोड वरील खरबी शिवारातील गणेश बार जवळील पत्राचे शेड मध्ये ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1400/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री सुर्यकांत मारुती कांबळे, ने. पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 276/2022 कलम 65 (ई) म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/1765 हनवते, मो.क्र. 8329998953** हे करीत आहेत.

## 8)विषारी औषध पिवून आत्महत्या :—

**उस्माननगर :—** दिनांक 03.08.2022 रोजी 23.04 वा. सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपूरी, नांदेड येथे,** यातील **मयत नामे सुमित बालाजी पवळे, वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. चिखली ता. कंधार जि. नांदेड,** यास महाराष्ट्र ग्रामीण बॅक यांचे पीक कर्ज आहे सतत होणाऱ्या पावसाने नापीकी झाल्याने व बॅकेचे व खाजगी कर्ज कसे फेडावे या चिंतेत त्यांनी कोणतेतरी विषारी औषध पिऊन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार सहदेव श्रीराम पवळे वय 36 वर्षे व्यवसाय शेती रा. चिखली ता. कंधार जि.नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उस्माननगर** आ. मृ. 30/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री केंद्रे, मो.नं. 9325976675** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 314 / 2022          दिनांक : 13.08.2022**

नांदेड पोलीस विभागातर्फे " 75 व्या स्वातत्र्याचा अमृत महोत्सव " निमित्ताने
10 कि.मी. एकता दौड संपन्न....

**"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** निमीत्ताने नांदेड पोलीस दलातर्फे आज दिनांक 13.08.2022 रोजी वार शनिवार रोजी 07.00 वा. जुनामोंढा टावर येथुन एकता दौडचे आयोजन करण्यात आले. सदर एकता दौडला **मा. श्री विपीन ईटनकर,** जिल्हाधिकारी, नांदेड व **श्रीमती सोम्या शर्मा,** उप विभागीय अधिकारी, देगलुर, यांनी हिरवी झेंडी दाखवुन एकता दौडची सुरवात करण्यात आली.

**"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव"** निमीत्ताने महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांच्या तर्फे 75 कि. मी. दौडचा संकल्प करण्यात आला होता. दिनांक 26.07.2022 ते दि. 12.08.2022 पर्यंत नांदेड पोलीस दलातर्फे दररोज सकाळी दौडचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये 65 कि. मी. दौड पुर्ण करण्यात आली. आज रोजी 10 कि. मी. एकता दौडचे आयोजन करून एकुण 75 कि. मी. एकता दौडचा समारोप करण्यात आला. सदर एकता दौड मध्ये **मा. श्री प्रमोद शेवाळे,** पोलीस अधिक्षक,नांदेड, **मा.श्री निलेश मोरे,** अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, **मा. श्री. विजय कबाडे,** अपर पोलीस अधिक्षक, भोकर, **मा. श्री आर्चीत चांडक,** सहा. पोलीस अधिक्षक उप विभाग बिलोली, **श्रीमती डॉ. अश्विनी जगताप,** पोलीस उप अधिक्षक, मुख्यालय, नांदेड, **मा. श्री. चंद्रशेन देशमुख,** उपविभागीय पोलीस अधिकारी नांदेड शहर या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भाग घेतला. तसेच नांदेड पोलीस दलातील अधिकारी, अंमलदार, नांदेड शहरातील नागरिक, महिला, पुरुष, शाळा व कॉलेजचे विद्यार्थी व शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, भरती पुर्व प्रशिक्षण घेणारे शहरातील संस्थाचालक व विद्यार्थी, एकता दौड मध्ये भाग घेतला होता. सदर एकता दौड हि जुनामोंढा टावर येथुन सुरूवात होवून वजिराबाद, कलामंदीर, आय.टी.आय., वर्कशॉप, राज कार्नर पासुन परत यु टर्न घेवून अण्णाभाऊ साठे चौक, हिंगोली गेट ओव्हर ब्रिज, चिखलवाडी कॉर्नर, गांधी पुतळा, श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, तिरंगा चौक मार्गे पोलीस मुख्यालय येथे एकता दौडमध्ये भाग घेतलेल्या स्पर्धकांना अल्पोपहार देवुन समारोप करण्यात आला.

तसेच सदर एकता दौडमध्ये चित्ररथ, वैद्यकीय अंबुलन्स, तसेच जागोजागी भाग घेणाऱ्या स्पर्धकांना पाण्याचे स्टॉल स्वयस्फुर्तपणे ठेवण्यात आले होते. शहरातील विवीध पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व वाहतूक शाखेकडुन योग्य तो बंदोबस्त लावण्यात होता.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड